# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः18.04.2026** **वारः शनिवार**

---

1. महिला आरक्षणासंदर्भातील, एकशे एकतिसावे घटना दुरूस्ती विधेयक लोकसभेत वादळी चर्चेनंतर नामंजूर,
2. विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या विरोधात दुहेरी नागरिकत्व प्रकरणी प्राथमिक माहिती अहवाल सादर करण्याचे निर्देश
3. पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला आणि
4. होर्मुझची सामुद्रधुनी सर्व व्यापारी जहाजांसाठी पूर्णपणे खुली करण्याची इराणची घोषणा

**महिला आरक्षण विधेयक**

महिला आरक्षणाच्या संदर्भातील एकशे एकतीसावं घटना दुरुस्ती विधेयक 2026 काल लोकसभेत मंजूर झालं नाही. हे घटना दुरुस्ती विधेयक असल्यानं त्यासाठी दोन-तृतीयांश खासदारांची मंजुरी आवश्यक होती; ती न मिळाल्यामुळे हे विधेयक लोकसभेत मंजूर होऊ शकलं नाही. सभागृहात उपस्थित 528 सदस्यांपैकी 298 सदस्यांनी या विधेयकाच्या बाजूने आणि 230 जणांनी विरोधात मतदान केलं. एकशे एकतीसावं घटना दुरुस्ती विधेयक 2026 नामंजूर झाल्यामुळे मतदारसंघ पुनर्रचनेशी संबंधित विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक ही अन्य दोन विधेयकंही मागे घेत असल्याचं केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी जाहीर केलं. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत 2029 पासून महिला आरक्षण लागू करण्यासाठी आवश्यक असलेलं घटना दुरुस्ती विधेयक सभागृहात मंजूर न झाल्याबद्दल रिजिजू यांनी दुःख व्यक्त केलं. हे विधेयक फेटाळून विरोधकांनी ऐतिहासिक संधी गमावल्याची टीका रिजिजू यांनी केली.

हे घटना दुरुस्ती विधेयक सभागृहात मंजूर न झाल्याबद्दल केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी खेद व्यक्त केला आहे. महिलांना 33 टक्के आरक्षण देणाऱ्या या महत्त्वाच्या विधेयकाला नकार देणं, त्यावर आनंद व्यक्त करणं आणि विजयी घोषणा देणं, अत्यंत निंदनीय आहे, विरोधकांनी नारी शक्तीचा अपमान केला आहे; त्यांना प्रत्येक निवडणुकीत, प्रत्येक पातळीवर आणि प्रत्येक ठिकाणी महिलांच्या रोषाचा सामना करावा लागेल, असं शहा यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान महिला आरक्षण आणि इतर विधेयकांवर काल दिवसभर लोकसभेत वादळी चर्चा झाली. महिला आरक्षण लागू करताना सर्व राज्यातल्या खासदारांची संख्या 50 टक्क्यांनी वाढणार आहे. त्यामुळे कुठल्याही राज्याच्या प्रतिनिधीत्वावर अन्याय होणार नाही, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या विधेयकावरच्या चर्चेला उत्तर देताना केलं. सध्या सुरू असलेल्या जनगणनेत जातनिहाय गणना होणार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. 'महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना देश माफ करणार नाही'. असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. या विधेयकाला विरोध करणारे ओबीसी, दलितांच्या विरोधातले असल्याचा दावा त्यांनी केला.

विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या विधेयकाला जोरदार विरोध केला. नारी शक्ती वंदन अधिनियमातल्या सुधारणांमधून केंद्र सरकार देशाच्या निवडणुकीचं गणित बदलण्याचा प्रयत्न करत आहे, असा आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. 2023मध्ये मंजूर केलेलं विधेयक सरकारनं पुन्हा आणावं, आम्ही त्याला तत्काळ पाठिंबा देऊ, असं ते म्हणाले. देशातले दलित, ओबीसी आणि इतरांकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न सरकारकडून सुरू असल्याची टीका त्यांनी केली.

**अधिनियम**

106 वी घटना दुरुस्ती अधिनियम 2023 म्हणजेच 'नारी शक्ती वंदन अधिनियम' कालपासून देशभरात लागू झाल्याची अधिसूचना जारी झाली आहे. 2023 मध्ये संसदेनं हा कायदा संमत केला. या कायद्यामुळे लोकसभा आणि दिल्लीच्या राष्ट्रीय राजधानी क्षेत्राच्या विधानसभांसह सर्व राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी एक तृतीयांश जागा फिरत्या पद्धतीने राखीव ठेवण्याची तरतूद या कायद्यात आहे.

**<u>हरिवंश</u>**

राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून हरिवंश नारायण सिंग यांची बिनविरोध निवड झाली. ते तिसऱ्यांदा या पदासाठी निवडून आले आहेत. 9 एप्रिल रोजी हरिवंश यांचा कार्यकाळ संपल्यानंतर हे पद रिक्त झालं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि इतर पक्षांच्या गटनेत्यांनीही हरिवंश यांचं अभिनंदन केलं.

**<u>राहुल गांधी</u>**

रायबरेलीचे खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या विरोधात दुहेरी नागरिकत्व प्रकरणी प्राथमिक माहिती अहवाल अर्थात एफआयआर नोंदवण्याचे निर्देश अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ पीठानं काल दिले. राहुल गांधी यांच्यावरच्या आरोपांची तपासणी होण्याची गरज असून या प्रकरणाचा तपास उत्तर प्रदेश सरकारनं स्वत: करावा किंवा केंद्रीय यंत्रणांकडे सोपवावा, असे निर्देशही न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांनी दिले आहेत.

**<u>पश्चिम बंगाल प्रचार-फडणवीस</u>**

पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी प्रचाराला वेग आला आहे. भाजप नेते आणि पश्चिम बंगालचे विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांनी पुरुलिया जिल्ह्यात पक्ष उमेदवारासाठी काल जाहीर सभांना संबोधित केले. भाजपची सत्ता आल्यास कोणत्याही तरुणाला रोजगारासाठी बाहेर राज्यात जावे लागणार नाही असं आश्वासन त्यांनी दिलं. दरम्यान, प्रचारफेरीनंतर कोलकाता इथं वार्ताहर परिषदेला संबोधित करताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पश्चिम बंगालची आर्थिक स्थिती खालावल्याचा आरोप केला. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनीही काल प्रचारात सहभाग घेतला. तर तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी उत्तर बंगाल, दक्षिण बंगाल आणि कोलकाता या भागांत जाहीर सभा घेतल्या. घटनादुरुस्ती आणि मतदारसंघ पुनर्रचनेच्या माध्यमातून भाजप बंगालचे विभाजन करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. टीएमसी नेते अभिषेक बॅनर्जी, सीपीआय(एम) पक्षाचे नेते मोहम्मद सलीम आणि सुजन चक्रवर्ती यांनीही उत्तर बंगालमध्ये जाहीर सभा घेतल्या, काँग्रेस आणि इतर पक्षांनीही राज्यभरात आपली प्रचारमोहीम तीव्र केली आहे.

तामिळनाडूमध्येही प्रचाराचा धडाका सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज कोईमतूर इथं राष्ट्रीय लोकशाही आघाडी उमेदवारासाठी प्रचार फेरीत सहभागी होणार आहेत. तर काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज तिरुचिरापल्ली जिल्ह्यातील तुरैयूर येथे 'सेक्युलर प्रोग्रेसिव्ह अलायन्स'च्या उमेदवारांसाठी प्रचार करतील. टीव्हीके पक्षाचे प्रमुख आणि अभिनेते विजय यांनी काल संध्याकाळी चेन्नईच्या पेरांबूर भागात घरोघरी जाऊन प्रचार केला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष नैनार नागेंद्रन आणि नेते के. अण्णामलाई यांनी भाजपचे उमेदवार तथा मंत्री एल. मुरुगन यांच्यासाठी प्रचार केला

**<u>सामुद्रधुनी खुली</u>**

होर्मुझची सामुद्रधुनी सर्व व्यापारी जहाजांसाठी पूर्णपणे खुली करण्याची घोषणा काल इराणनं केली. लेबनॉन आणि इस्रायल यांच्यात 10 दिवसांच्या शस्त्रसंधीची घोषणा केल्यानंतर शस्त्रसंधीच्या उर्वरीत कालावधीसाठी हा मार्ग खुला राहील असं इराणचे परराष्ट्र व्यवहारमंत्री अब्बास अराघची यांनी सांगितलं. मात्र सर्व जहाजांनी इराणच्या बंदर आणि सागरी संघटनेनं आधीच जाहीर केलेल्या समन्वित मार्गावरूनच प्रवास केला पाहिजे, असंही ते म्हणाले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या या निर्णयाचं स्वागत केलं आहे.

**<u>होर्मूझ-अमेरिका</u>**

इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतून वाहतूक पूर्ववत होण्यासाठी पावलं उचलली असली तरीही इराणसमवेत सर्वसमावेश अंतिम शांतता करार होत नाही तोपर्यंत इराणची नौदल नाकेबंदी कायम राहील असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलं आहे.

**<u>अमेरिका-युरेनियम इराण</u>**

इराणने आपल्याकडील युरेनिअम अमेरिकेला हस्तांतरीत करण्यास सहमती दर्शवल्याचा अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनी केलेला दावा इराणनं फेटाळून लावला आहे. इराणचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी, सद्यपरिस्थिती अशा कोणत्याही कृतीला परवानगी देणार नसल्याचं स्पष्ट केलं आहे.

**निमंत्रण**

इस्त्राएल आणि लेबनॉन यांच्यात शस्त्रसंधी झाल्याचं भारतानं स्वागत केलं आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी नवी दिल्ली इथं आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. शांततेच्या दिशेनं टाकलेल्या प्रत्येक पावलाचं भारत स्वागत करतो, असंही ते म्हणाले. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक संरक्षित करण्याकरिता सुरू असलेल्या प्रयत्नांचा भाग म्हणून ब्रिटन आणि फ्रान्सच्या नेतृत्वाखालील सागरी उपक्रमात सहभागी होण्यासाठी भारताला आमंत्रित करण्यात आलं असल्याची माहितीही जयस्वाल यांनी दिली. जगातील सर्वात महत्त्वाच्या ऊर्जा मार्गांपैकी एक असलेल्या या मार्गाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदाय निकडीचे प्रयत्न करत असताना हे आमंत्रण आलं आहे. जागतिक तेल व्यापारापैकी सुमारे वीस टक्के व्यापार या मार्गाद्वारे होतो.

**नौदल परिषद**

नौदल कमांडर परिषद 2026 च्या पहिल्या टप्प्याचा काल दिल्लीत समारोप झाला. चार दिवसांच्या या परिषदेमध्ये नौदलाची कार्यसंचालन आणि सामग्री सज्जता, पायाभूत सुविधा, मनुष्यबळ विकास उपक्रम आदी विषयांचा सर्वसमावेशक आढावा घेण्यात आला. पश्चिम आशियातील सध्याच्या तणावपूर्ण स्थितीच्या पार्श्वभूमीवर सध्याच्या कार्यसंचालन वातावरणाचेही या परिषदेमध्ये मूल्यमापन करण्यात आलं. या परिषदेदरम्यान, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश कुमार त्रिपाठी यांच्या हस्ते भारतीय नौदल सागरी सुरक्षा धोरण प्रकाशित केले तसंच सागर मंथन या कार्यक्रमाचंही आयोजन केलं होतं.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये, दक्षिण अफ्रिकेत डर्बन इथं खेळल्या जात असलेल्या भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातील पाच आंतरराष्ट्रीय टी 20 सामन्यांच्या मालिकेच्या पहिल्या सामन्यात भारताला दक्षिण अफ्रिकेकडून पराभव पत्करावा लागला. भारतानं दिलेलं 158 धावांचं लक्ष्य यजमान संघानं 19 षटकं एका चेंडूतच गाठलं. अयाबोंगा खाका हिला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं. या विजयानं मालिकेत दक्षिण अफ्रिकेनं 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार.